तात्काळ /अर्थसंकल्प प्राथम्य <u>महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०१८ निधी वितरण.</u>

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्र .अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ०२ एप्रिल, २०१८

<u>परिपत्रक</u>

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, **"महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८"** यांच्या अनुसूचीच्या स्तंभ- ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांस विधानमंडळाने मंजूरी दिली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०१८ चा **महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२२** म्हणून **महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४**, दिनांक २७ मार्च, २०१८ यामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे .

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि .१० सप्टेंबर, २००१ अन्वये विहीत केल्यानुसार नवीन **पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास** वित्त विभागाची व कार्यक्रम खर्चाच्या बाबतीत नियोजन व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यावर असे प्रस्ताव दि .१० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या उच्च स्तरीय सचिव समितीपुढे सादर करुन, समितीच्या मान्यतेनंतर आवश्यकतेनुसार काही प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात यावेत. अशा प्रकारे उच्च स्तरीय सचिव समितीची व आवश्यक तिथे मंत्रिमंडळाची मान्यता असल्याशिवाय कोणतेही पद निर्माण करण्याचे आदेश काढू नयेत. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि. २५ मे, २०१७ अन्वये आकृतिबंद अंतिम करुन मंजूर करुन घेतल्याशिवाय पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही व पदे रुपांतरीत करण्यासही अनुमती देण्यात येणार नाही, असे मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले आहे.

तसेच सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पामध्ये काही नवीन बाबी अशा आहेत की, त्यामध्ये पद निर्मितीचा खर्च अंतर्भूत आहे. ज्या पदांच्या निर्मितीपूर्वी प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे, अशी पदे निर्माण करण्यासाठी उच्च स्तरीय सचिव समितीची व आवश्यक तिथे मंत्रिमंडळाची मान्यता घेतली नसल्यास त्यासाठी नवीन बाबीद्वारे केलेली तरतूद वगळून राहिलेल्या रकमा परिच्छेद-४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे मंत्रालयीन विभागांना त्यांच्या दुय्यम कार्यालयामध्ये वाटून देता येतील. नवीन पदांसाठी केलेली तरतूद नंतर आवश्यकतेनुसार मंत्रिमंडळाची अथवा उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाल्यानंतर व त्याबाबतचे आदेश काढल्यानंतर याबाबतची तरतूद दुय्यम कार्यालयाना वाटता येईल. तथापि असे प्रस्ताव मंत्रिमंडळाने अथवा उच्चस्तरीय सचिव समितीने अमान्य केल्यास याबाबतची तरतूद प्रत्यार्पित करुन गौणशिर्ष" राखीव "कडे घेण्यात यावी.

३. या ठिकाणी असेही नमूद करण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०१६ /प्र.क्र.८८/अर्थ-१, दि. २७ जानेवारी, २०१७ नुसार सन २०१७- २०१८च्या आर्थिक वर्षापासून योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे वर्गीकरण अनुक्रमे अनिवार्य खर्च व कार्यक्रमांवरील खर्च असे करण्यात आलेले असून त्याचे समन्वयन व विनियमन वित्त विभागामार्फत करण्यात येणार आहे.

तथापि यानुषंगाने पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत यापुढे कार्यक्रमांवरील खर्चाच्या प्रस्तावास नियोजन विभागांतर्गतच्या विकास क्षेत्र कार्यासनांची तसेच वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

४. सर्व मंत्रालयीन विभागांना असे कळविण्यात येते की, वित्तीय वर्ष २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यांनतर सन २०१८-२०१९ च्या प्रथम **नऊमाहीकरीता** (डिसेंबर ,२०१८ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक **तरतूदीच्या ७० टक्केच्या मर्यादेत** सदर प्रणालीद्वारे (बीम्स) वितरीत केला जाईल. तथापि आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीच्या तरतूदी १००% वितरीत करण्यास सहमती राहील. याचबरोबर शेतकऱ्यांसंदर्भातील मनरेगा (नियोजन विभाग), पिक विमा (कृषी विभाग), कर्ज माफी (सहकार विभाग) व मदत व पुनर्वसन विभागाच्या तरतूदीही १००% वितरीत राहतील. तसेच केंद्र पुरस्कृत कार्यक्रम व त्याअनुरुप राज्य हिस्सा यासाठीच्या तरतूदीही १०० टक्के वितरीत होतील. मात्र त्याचे अंतिम वितरण करण्यापूर्वी विभागाने **परिच्छेद-७** (६) **नुसार** कार्यवाही करणे आवश्यक राहील. सबब, याप्रमाणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (बीम्स) निधी वितरीत करण्यात येत आहे .

५. मासिक विवरणपत्रानुसारचा निधी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीमध्ये पुढे/मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर देण्यात येत आहे. निधी वितरीत करतांना मासिक निधी विवरणपत्रात (Cash Flow Statement) ज्या दरमहा खर्च रकमा दर्शविल्या आहेत त्याच्याशी सुसंगत असाव्यात.

६. प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार असतांनाही निधी वितरणाचे प्रस्ताव वित्त विभागाकडे संदर्भ केले जातात. यासंदर्भात अनेकदा संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे वित्त विभागाकडे संदर्भित करावयाच्या प्रस्तावांबाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :--

अ) एखाद्या कार्यक्रमास / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे :- वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-पहिला नुसार रुपये पन्नास लक्ष आवर्ती व रुपये पाच कोटी अनावर्ती योजनेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना आहेत. त्यापुढील अधिकार प्रशासकीय विभागांना नसल्याने असे प्रस्ताव वित्त विभागाला मान्यतेसाठी सादर केले जातात. पद निर्मितीसाठी आवर्ती खर्च असल्यास अशा पदनिर्मितीसाठीही वित्त विभागाची व उच्चाधिकार समितीची सहमती आवश्यक असते.

ब) अशा कार्यक्रमास / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सुध्दा अर्थसंकल्पिय तरतूद करणे आवश्यक असते. कार्यक्रम खर्चाचा प्रस्ताव असल्यास त्यासाठी नियतव्यय उपलब्धता व हा नियतव्यय अर्थसंकल्पित करणे तसेच अनिवार्य खर्चाचा प्रस्ताव असल्यास आवश्यक ती बचत त्यासाठी उपलब्ध आहे किंवा कसे, ते स्पष्ट होणे आवश्यक असते.

क) एखादया कार्यक्रम / प्रकल्पाच्या खर्चाच्या बाबीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असेल ,तसेच खर्चासाठी तरतूद उपलब्ध असेल व खर्च मंजूरीचे विभागास वित्तीय अधिकार असल्यास परत निधी वितरणास वित्त विभागाची सहमती आवश्यक नाही. अन्यथा सहमती घ्यावी लागेल .

७. प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.४.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागांना वेळोवळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत असलेल्या प्रकरणांबाबत वित्त विभागाची वेगळयाने मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. तसेच **सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग यांना त्यांचे मॅन्युअलनुसार तसेच ही मॅन्युअल यथास्थिती सुधारीत केल्याप्रमाणे लागू असलेल्या विभागांना असे खर्चाचे अधिकार प्राप्त आहेत.** सदर शासन निर्णयातील नमूद बाबीं व्यतिरिक्त ज्या बाबीसाठी विभागांना विवक्षीतपणे वित्तीय अधिकार प्रत्यार्पित केले नसतील, अशा बाबींच्या संदर्भात वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. प्रशासकीय विभागांनी निधीबाबत महाराष्ट्र अर्थसंकल्प नियतपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या नियमांचे तसेच या परिपत्रकातील पुढील सूचनांचे पालन करावे.

(१) (अ)सहायक अनुदाने (वेतनेतर) :- विविध शासकीय/प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत. तसेच ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानाचा ७५% विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोषागार अधिकाऱ्यांनी, सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर केलेल्या देयकासोबत संबंधित संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) ची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारित करु नये.

(आ) सहायक अनुदाने (वेतन) :- शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरीत्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

(२) स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे यांना अनुदान :- स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महामंडळे यांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणाऱ्या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या रकमा वसूल करुनच उर्वरित अनुदान वितरीत करण्यात यावे. तसेच शासनाद्वारे सदर संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग व अखर्चित रक्कम कुठे ठेवली आहे याबाबतची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यात यावी. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे. एखाद्या कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी अखर्चित असल्यास त्याच प्रयोजनासाठी चालू वर्षी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय निधी वितरीत करु नये.

(३) वैयक्तिक लाभार्थ्यांचा कार्यक्रम :- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाअंतर्गतची लाभार्थ्यांची देयके आहरित करतांना लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरित करण्यात येऊ नयेत. वैयक्तिक लाभार्थ्यांचे कार्यक्रम आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात यावीत व अनुदानाचे प्रदान इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमनेच (ECS) करण्यात यावे.

(४) शिष्यवृत्ती :- शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी तसेच सवलतीपोटी दिलेले अनुदान इत्यादीची प्रदाने इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमनेच (ECS) अदा करण्यात यावीत. अशा सर्व बाबी आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात याव्यात.

(५) बांधकाम विषयक प्रस्ताव :- बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन कामनिहाय निधी अर्थसंकल्पीत करणे आवश्यक आहे. नवीन कामांबाबत निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यानंतरच कामाची निविदा सूचना काढून कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम सुरु करावे व आवश्यकतेप्रमाणे निधीचे वितरण करण्यात यावे. जुन्या कामांचा आढावा घेऊन ती प्राथम्याने पूर्ण करण्यात यावीत व हा निधी ठेव बांधकामाचे स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करु नये.

(६) केंद्र पुरस्कृत कार्यक्रम :- केंद्र पुरस्कृत योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री संबंधित विभागाने नस्त्यावर वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडून करुन घ्यावी (यासाठी व्यय/अर्थसंकल्प शाखेला नस्ती संदर्भीत करण्याची आवश्यकता नाही) व तद्नंतर सदर निधी तसेच असल्यास राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय विभागाने त्यांचे स्तरावर वितरीत करावा. यासाठी नस्ती पुन्हा वित्त विभागास सहमतीसाठी वेगळ्याने संदर्भीत करण्याची आवश्यक नाही. मात्र , मागील वर्षामधील केंद्र शासनाचा निधी चालू वर्षी खर्च करावयाचा असल्यास त्यास वित्त विभागाची सहमती घेणे अनिवार्य राहील. केंद्र सहाय्यीत / केंद्र पुरस्कृत कार्यक्रम यांच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीत करण्यात आलेला केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी इतरत्र वळविण्यात येऊ नये.

(७) खरेदी प्रक्रिया :- सर्व मंत्रालयीन विभागांना असेही कळविण्यात येते की ,"शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका", उद्योग ,ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या क्र. भांखस - २०१४ / प्र.क्र.८२/ भाग-III / उद्योग-४, दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केली आहे. सदर शासन निर्णय व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे खरेदीप्रक्रिया पूर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय तसेच या मार्गदर्शक सूचनेतील अटींचे पालन करुन खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात यावीत. खरेदीविषयक धनादेश संबंधित पुरवठादाराच्याच नावाने व शक्यतो इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमद्वारे (ECS) अदा करण्यात यावेत.

(८) संक्षिप्त देयक :- अनेक वेळेला विभागांद्वारे संक्षिप्त देयकाव्दारे निधी खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. तरी यापुढे विभागांनी ज्या लेखाशीर्षाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशिर्षाखालील निधी वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरित करु नये.

(९) अखर्चित रकमा :- विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांनी त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते, ही एक प्रकारची अनियमितता आहे, याची विभागांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेला यापूर्वीचा अखर्चित निधी (स्वीय प्रपंजी खात्यातील / महामंडळाच्या खात्यातील वा इतर प्रकारे खर्च दर्शवून बाहेर ठेवण्यात आलेला) संपूर्णत: खर्च झाल्याशिवाय तरतुदी आहरित वा वितरीत करु नयेत. याठिकाणी असेही निदर्शनास आणण्यात येते की, स्वीय प्रपंजी लेख्याखाली विभागांकडे बऱ्यांच मोठया प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचे दिसून येते. सदर निधीचा ताळमेळ घालून व लेखा परिक्षण करुन निधी विहीत मुदतीत खर्च न झाल्यास तो शासनाच्या तिजोरीत परत करण्यात यावा. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे.

८. वरील प्रमाणे अर्थसंकल्प अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरित करण्यापूर्वी या परिपत्रकात नमूद सूचनांची तसेच सोबतच्या परिशिष्टातील नमूद केलेल्या बाबींच्या तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची प्रतिपूर्ती होत असल्यास विभागाने त्यांच्या स्तरावर निधी वितरीत करावा, अन्यथा अशा प्रस्तावास प्रशासकीय विभागांनी **आवश्यक तेथे नियोजन / सामाजिक न्याय / आदिवासी विकास विभाग यांच्या मान्यतेनंतर वित्त विभागाच्या व्यय शाखा व अर्थसंकल्प शाखा यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच असे मान्यतेचे प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवितांना कोणत्या अटी व शर्तीस शिथीलता आवश्यक आहे ते स्पष्टपणे नमूद करुनच योग्य त्या कारणमीमांसेसह प्रस्ताव वित्त विभागाला सहमतीसाठी पाठवावेत, अन्यथा असे नमूद नसल्यास वित्त विभागाच्या उप सचिव स्तरावरच नस्ती प्रशासकीय विभागाला परत करण्यात येईल .**

९. वेतनविषयक खर्च वगळता उर्वरित बाबींचा खर्च आर्थिक वर्षाचे कालावधीत समप्रमाणात केला जात नाही ,असे निदर्शनास येते. निधी उपलब्ध असूनही प्रक्रियेअभावी तो खर्च करता येत नाही. परिणामी, बहुतांश तरतूदी वर्षभर अखर्चित राहतात व आर्थिक वर्षाचे अखेरचे कालावधीत पुरेशा तयारीशिवाय खर्च केला जातो. दरवर्षी २५ % पेक्षा जास्त अर्थसंकल्पित तरतूद आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्च झालेली दिसते. या सर्व बाबींमुळे वित्तीय शिस्तीचे पालन केले जात नाही . विकास कार्यक्रमांची प्रगती राखली जात नाही. त्यामुळे सन २०१८-२०१९ या वर्षासाठी विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे. याबाबतचा आढावा प्रशासनिक विभागांनी दर ३ महिन्यांनी सचिव स्तरावर घ्यावा व वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रमाणाबाहेर खर्च (Rush of Expenditure) होणार नाही याची दक्षता घ्यावी व तशा सूचना नियंत्रक अधिकाऱ्यांना द्याव्यात. याबाबत आर्थिक अनियमितता झाल्यास त्यास प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

१०. उपरोक्त अटी व शर्तीबरोबरच विभागांना सूचना देण्यात येते की, खर्च करतांना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली व सर्व अटी /शर्तींचे पालन करणे ही जबाबदारी विभागांची राहील .

११. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४०२१६२०३४९९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=16a60323ef3beff915e7cf13b9836a7df2ad6df610965aab153a71bdb81c36c1, cn=Vasant K. Patil
Date: 2018.04.02 16:23:48 +05'30'

(व. कृ. पाटील)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
३. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव/ सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११०००१
९. प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१०. प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

परिपत्रक क्र .अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ सोबतचे "परिशिष्ट".

अ.क्र.	**खर्चाचे स्वरुप**	
१	अर्थसंकल्पात समाविष्ट असलेला नवीन अनिवार्य व कार्यक्रम खर्च	अनिवार्य खर्चाबाबत-वित्त विभाग व कार्यक्रम खर्चाबाबत यथास्थिती नियोजन / सामाजिक न्याय / आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाची सहमती आवश्यक.
२	अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या जुन्या कार्यक्रमावरील खर्च	कार्यक्रम खर्चाच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत असल्यास यथास्थिती नियोजन / सामाजिक न्याय / आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाची सहमती आवश्यक.
३	अर्थसंकल्पात समाविष्ट असलेला चालू व जुन्या अनिवार्य बाबींवरील खर्च	अनिवार्य खर्चाच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत असल्यास वित्त विभागाची सहमती आवश्यक.
४	अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या "केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांचा खर्च".	केंद्र पुरस्कृत कार्यक्रमासंदर्भात केंद्र शासनाकडून प्रत्यक्षात निधी प्राप्त झाल्याशिवाय सदर निधी प्रत्यक्षात आहरित करण्यात येऊ नये. यासाठी वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेची सहमती आवश्यक. त्याचप्रमाणे ज्या कार्यक्रमांवर केंद्र शासनाच्या निधीसोबत राज्य शासनाचा समरुप हिस्सा यथोचित अर्थसंकल्पीत झाला असेल तो निधी राज्य शासनाच्या हिश्श्याच्या मर्यादेतच आहरित करावा.
४	अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या **"बाहय सहाय्यित"** (EAP) कार्यक्रमांचा खर्च.	नियोजन व वित्त विभागाची सहमती आवश्यक.
५	शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार राबविण्यात येणा-या विशेष स्वरुपाचे कार्यक्रम, (उदा. कर्जमाफी योजना, नुकसान भरपाईसाठी अर्थसहाय्य)	वित्त विभाग यथास्थिती नियोजन विभागाची सहमती आवश्यक.
६	तेराव्या / चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केलेल्या सर्व तरतूदी.	वित्त विभागाची सहमती आवश्यक.
७	४५) व्याज प्रदाने. ५६) कर्जाची परतफेड.	राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून प्राप्त झालेल्या कर्जावरील व्याज व परतफेडीची रक्कम प्रत्यक्षात झालेल्या वसूलीच्या मर्यादेतच वितरीत केली जाईल. त्याबाबत वित्त विभागाची समंती आवश्यक राहील.

<table>
<tr><td>८</td><td>अनिवार्य व कार्यक्रम खर्चाच्या तरतुदींपैकी खालील तपशीलवार शिर्षाचा खर्च.</td><td rowspan="7"><u>तपासणी सूची :-</u>
१) योजनेस प्रशासकीय मान्यता.
२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.
३) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र.
४) यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.
५) निधी लाभार्थ्याच्या थेट खात्यात जमा होणार आहे.
६) वस्तु खरेदी करण्यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र.
७) यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.
८) आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी / सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.
९) प्रस्तुत योजनेत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.
१०) निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.
वरील अटींची तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद-७ मधील अटींची पुर्तता होत असल्यास प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावर निधी वितरीत करावा व निधी वितरीत करणाऱ्या आदेशामध्ये वरील प्रत्येक अटीची पुर्तता झाली आहे, असे प्रमाणपत्र देऊन आदेश निर्गमित करावेत, अन्यथा प्रस्ताव आवश्यक त्या ठिकाणी नियोजन / वित्त विभागाला सहमतीसाठी सादर करावेत.</td></tr>
<tr><td></td><td>३१) वेतनेत्तर सहायक अनुदाने</td></tr>
<tr><td></td><td>३२) अंशदाने</td></tr>
<tr><td></td><td>३३) अर्थसहाय्य</td></tr>
<tr><td></td><td>३५) भांडवली खर्चासाठी सहाय्यक अनुदाने</td></tr>
<tr><td></td><td>५४) गुंतवणूका</td></tr>
<tr><td></td><td>५५) कर्जे व अग्रिम</td></tr>
</table>

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=16a60323ef3beff915e7cf13b9836a7df2ad6df610965aab153a71bdb81c36c1, cn=Vasant K. Patil
Date: 2018.04.02 16:25:05 +05'30'

(व. कृ. पाटील)

सह सचिव, महाराष्ट्र शासन